FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154214

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ........, पहिली खबर क्र. FIR No. ६, वर्ष Year २०२२, दिनांक Date १६/२/२०२२
2. (i) अधिनियम Act भ. प्र. कायदा १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from १४/२/२०२२ वेळ Time ११:००, तारीख पर्यंत Date to १६/२/२०२२ वेळ Time १६.४०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १४/२/२०२२, वेळ Time ११:००

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४७, तारीख Date १६/२/२०२२ वेळ Time २१.३०
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी.
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........

   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name के/पूर्व वार्ड, दुसरा मजला, अनुज्ञापन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, Ward अंधेरी (पूर्व), (Name of) road मुंबई-६९.

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री मनिष

   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बलभद्र आर्या

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २२/३/१९८२ वय - ४० वर्षे.

   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९२२४१४७४२९

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........

   (f) व्यवसाय Occupation भाजीपाला विक्रेता व हातगाड्या भाड्याने देणे.

   (g) धर्म Religion हिंदू जात Caste गुजराती, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता Address : के.ई., रूम नं. १५५-२१२, बच्चन, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........

   रस्त्याचे नाव Road वासुदेव चाळ, जनता कॉलनी, प्रेम नगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place जोगेश्वरी (पू) मुंबई ४०००६०, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र - सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   १) श्री धनंजय सुर्यकांत गोळे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मुलन), के/पूर्व, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (पू) मुंबई-६९.

   २) श्री उमेश रामभाऊ शेट्टी, वय ५५ वर्षे व्यवसाय - अनुज्ञापन निरिक्षक, के/पूर्व वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (पू) मुंबई - ६९.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018- PA3-(K) 829

यातील फिर्यादी श्री मनिष बलभद्र आर्या, वय ४० वर्षे, धंदा- भाजीपाला व्यवसाय व हातगाड्या भाड्याने देणे. रा.ठि.- सेक्याचा पत्ता- के.ई.एम. ६५५/२/२ बचन, वासुदेव चाळ, जनता कॉलनी, प्रेम नगर, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई. यांच्या स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून तिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] 16/2/2022

निलिमा डोळस
पोलीस निरिक्षक
भा.प्र.वि., मुंबई.

Manish

फिर्याद दिनांक – १६/०२/२०२२

श्री. मनिष बलभद्र आर्या, वय ४०, धंदा – भाजीपाला विक्री, रा.ठि.– के.ई.एम. ९५५– २/२ बचन, वासुदेव चाळ, जनता कॉलनी, प्रेम नगर, जोगेश्वरी (पू), मुंबई – ६०, मो.क्र. ९२२४१४७४२९, ९०८२०५६८१३

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझ्या कुंटुबियासोबत ४० वर्षापासून राहत आहे. माझा भाजीपाला विकण्याचा व्यवसाय असून माझ्याकडे अंदाजे ४० हातगाडया आहेत. सदर हातगाडया मी भाडयाने देतो यामधून मिळणाऱ्या उत्पन्नामधून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझ्या हातगाडया बृहन्मुंबई महानगरपालिका के–पूर्व या कार्यालयाच्या अधिपत्याखालील परिसरात काम करतात. माझ्या सारखेच श्री. चमण व इतर तीन व्यक्ती असुन त्यांच्याकडे सुध्दा साधारण ५० ते ६० हातगाडया असुन त्या सुध्दा हातगाडया भाडयाने देतात.

बृहन्मुंबई महानगरपालिका के–पूर्व या कार्यालयात अतिक्रमण निर्मुलन विभागातील वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन, श्री. धनंजय गोळे मागील दोन ते तीन महिन्यापूर्वी नव्याने हजर झाले आहेत. त्यांनी माझ्याकडून तसेच माझ्या सहकारी यांच्याकडे हातगाडयावर कारवाई न करण्याकरीता सर्व मिळून दरमहा रु. ४०,०००/– देण्याबाबत मला व माझ्या मित्राना सांगितले होते. तसेच ते पैसे न दिल्यास आम्हाला त्रास देत असत त्याचप्रमाणे हातगाडयावर कारवाई करू लागले.

माहे जानेवारी २०२२ महिन्यामध्ये मी अतिक्रमण निर्मुलन विभागातील वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन, श्री.धनंजय गोळे यांनी आमच्या हातगाडयावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी जानेवारी २०२२ मध्ये रु. ४०,०००/– मासिक हफ्ता घेतला. त्यानंतर दिनांक १०, फेब्रुवारी २०२२ रोजी रु. ३२,०००/– रोख घेतले आहेत. उर्वरीत रु.८,०००/– माझा सहकारी श्री.चमण कडून येणे बाकी असल्याने नमुद रक्कम मी दिलेली नव्हती.

श्री. धनंजय गोळे, वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन यांनी मागील तीन दिवसापासून रु. ८,०००/– मिळण्याबाबत तगादा लावला होता. मला श्री. धनंजय गोळे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १४/०२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक १४/०२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे म.पो.नि. निलीमा डोळस यांचेकडे वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन श्री. धनंजय गोळे यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार लिहुन दिली. म.पो.नि. निलीमा डोळस यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले.

म.पो.नि. डोळस हया मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये म.पो.नि. निलीमा डोळस यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. त्यानंतर सापळा पथकातील पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. जॉन, अंमलदार यांची ओळख करुन दिली त्यानतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी रवाना झालो. शासकीय वाहन पश्चिम द्रुतगती महामार्ग, साई दर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था, सागर हॉटेल जवळ, अंधेरी (पूर्व) डाव्या बाजूला थांबले. मला व पंच श्री बापूसाहेब खंडागळे यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. तेथे पो.

लावण्यात आले. त्यानंतर मी व पंच खंडागळे श्री. धनंजय गोळे, यांच्या के/पूर्व कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात गेलो.

के/पूर्व कार्यालयात लोकसेवक गोळे यांची यांची भेट घेतली असता लोकसेवक म्हणाले की, चमण का पैसा किधर है. कभी मिलेगा चमन का पैसा त्यावर मी म्हणालो की, चमन की मम्मी ऑफ हुआ है. मम्मी ऑफ होके वो आके अभी चार दिन हो गया... तो क्या वो उतना ही लेके बैठा है क्या...मम्मी ऑफ हो गयी उसके बाद मे पैसे को हाथ ही नही लगाया उसने... इधर आके किसीके साथ मे हिसाब ही नही लिया... कैसा बोलता है मनीष तू... बताना मेरे को... त्यानतर मी म्हणाले की, चमण का वही थोडा पैसे के लिये थोडासा जो उसका बचा हे आठ हजार रुपया त्यानंतर लोकसेवक पुढे म्हणाले की, आठ क्या नौ हजार रूपया अशा प्रकारे संभाषण झाले'' त्यानंतर मी आणि पंच श्री खंडागळे असे शासकीय वाहनाजवळ आलो.

दिनांक १४/०२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने दिनांक १६/०२/२०२२ रोजी मी माझा मोबाईल फोन क्र. ९०८२०५६८१३ वरून माझा सहकारी चमन यांच्या मोबाईल क्र. ९८२१५४८८३० फोन केला की, गोळे साहेब पैसे मागत आहेत तर मी तुझ्या वतीने त्यांना रु ८,०००/— देतो. त्याने त्यास होकार दिल्याने मला व पंचाना मपोनि डोळस व पर्यवेक्षक अधिकारी सपोआ जॉन यांनी सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती व सुचना दिल्या.

त्यानंतर माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माझे अंगझडतीत मिळून आलेल्या वस्तु पो.नि. डोळस याचेकडे ठेवल्या. तद्नंतर मी दिलेल्या नोटांचे म.पो.नि. डोळस यांनी मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस चालक श्री. सय्यद यांनी अॅथ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत म.पो. नि. डोळस यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक श्री. गोळे यांनी के/पूर्व वार्ड, अंधेरी येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मी माझा मास्क काढुन डोक्यावरून हात फिरवण्याची कृती करेन अशी सुचना केली.

तद्नंतर म.पो.नि. डोळस यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, पो.ना. रावराणे यांच्या मदतीने माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. खडांगळे लोकसेवक गोळे यांना भेटण्याकरीता त्यांच्या के/पूर्व वॉर्ड कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात गेलो. बाकीचे पथक कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने के/पूर्व कार्यालयात उभे राहिले.

परंतु सदरवेळी लोकसेवक गोळे कार्यालयात हजर नव्हते ते पार्ला येथे गेल्याचे तेथील कर्मचाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे म.पो.नि. डोळस व सपोआ जॉन यांच्या सुचनेप्रमाणे मी व पंच खंडागळे पुन्हा के/पूर्व कार्यालयातून बाहेर आलो. के/पूर्व कार्यालयाच्या जवळ असलेल्या सनिश्का डेव्हलपर्स, व्हिलेज गुंदवली, अंधेरी पूर्व सोसायटीच्या आवारामधून लोकसेवक गोळे यांना त्यांचा मोबाईल क्र. ९८९२१८०८९० वर फोन केला परंतु सदर वेळी त्यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर मला माझ्या मोबाईल क्र. ९०८२०५६८१३ वर माझ्या सहकारी चमन यांचा मोबाईल क्र. ९८२१५४८८३० ने फोन आला त्यावेळी त्याच्याशी बोललो. त्यानंतर मला लोकसेवक गोळे यांच्या मोबाईल फोन क्र. ९८९२१८०८९० वरून फोन आला. सदरवेळी त्यांनी मला फोन द्वारे सांगितले की, त्यांच्या कार्यालयातील लायसन्स इनस्पेक्टर उमेश शेट्टी यांना भेटा व त्यांच्याकडे पैसे दया.

त्यानंतर मी व पंच खंडागळे पुन्हा के/पूर्व कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात लायसन्स इनस्पेक्टर श्री. उमेश शेट्टी यांना भेटलो त्यावेळी लोकसेवक श्री उमेश शेट्टी यांनी लोकसेवक गोळे यांचा फोन आला होता असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला व पंच यांना लोकसेवक श्री. गोळे यांच्या दालनात घेऊन गेले व त्यांनी लाचेची

रक्कम स्विकारून त्यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवून दिली. त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर आलो सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मास्क काढुन डोक्यावरून हात फिरवल्याची कृती करून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ पथकातील अंमलदारांनी पुढे येवून लोकसेवक श्री. उमेश शेट्टी यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यानंतर म.पो.नि. डोळस यांनी मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद करून स्वत:कडे ठेवला व लोकसेवक शेट्टी यांना स्वत:ची ओळख सांगितली. त्यांनतर त्यांनी माझ्याकडे दिलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी सांगितले कि, सदरची रक्कम मी लोकसेवक श्री. शेट्टी यांना दिली असता त्यांनी ती स्विकारून त्यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. शेट्टी यांनी प्रस्तुत प्रकरणी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमूद पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

काही वेळातच लोकसेवक श्री. गोळे हे देखील कार्यालयात आले. त्यांना देखील सापळा पथकाने ताब्यात घेतले. तरी लोकसेवक श्री. धनंजय गोळे यांनी हातगाडयावर कारवाई करू नये याकरीता रू. ८,०००/— इतकी लाचेची रक्कम मागुन दिनांक १४/०२/२०२२ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल करून दिनांक १६/०२/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री उमेश शेट्टी यांनी लोकसेवक श्री धनंजय गोळे याचे सांगण्यावरून सदर रू. ८०००/— रक्कम स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. धनंजय गोळे व लोकसेवक श्री. उमेश शेट्टी यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा श्री. धनंजय गोळे, श्री. उमेश शेट्टी यांचेशी कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

**( निलीमा डोळस )**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

स्विकारलेली लाचेची रक्कम - ८,०००/- रुपये

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved —

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील वा.न.ता वेव हि फिर्यादी यांचा आजीपालकाचा व्यवसाय असून कि" ह यांचे सहकारी हे म.न.पा. सह आयुक्त कोपु विभागाच्या हद्दीत आजीपाला विक्री करणारे यांना "कि" हातगाड्या आड्याने देतात. सदर हातगाड्यावर" कारवाई करु नये" याकरीता कॉलम-७ मधील आलोसे क्र-१ यांनी मासिक ४०,०००/- रुपयाचा हप्ता ठेवला होता, त्यापैकी दि 10/02/2022 रोजी रक्कम 32,000/- रोख होतले होते. व उर्वरित रुपये ८,०००/- रक्कम येणे बाकी असल्याने "कि" यांच्याकडे तगादा लावला होता. पडताळणी कारवाई मध्ये आलोसे क्र-१ याची लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने सापळा कारवाई मध्ये आलोसे क्र-१ यांच्या सांगण्यावरुन "कि" यांच्याकडुन लाचेची उर्वरित रक्कम ८,०००/- रक्कम स्विकारताना "आ"-२ यांना रंगेहाथ पकडण्यात आले तसेच "आ"-१ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्या विरुद्ध भ.प्र.अधि.१९८८ कलम-७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरिक्षक निलिमा डोळस.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........

District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature]

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... निलीमा केशव डोळस

पदनाम Rank...... पोलीस निरिक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**